महाराष्ट्र शासन
**सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद**
**पीरबाजार, उस्मानपुरा, पत्रपेटी क्र.५१६, औरंगाबाद – ४३१ ००५**
दुरध्वनी क्र.: ०२४०-२३३४२१६/२३३४७६९
इमेलः roaurangabad@dtemaharashtra.gov.in website: www.dteau.org

जा.क्र. : विकाऔ/शिक्षण/२०२०/ 1682 दिनांक : 30 SEP 2020

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित/विना-अनुदानित
व्यावसायिक अभ्यसक्रमांच्या पदविका/पदवी/पद्व्युत्तर पदवी संस्था
औरंगाबाद विभाग.

विषयः- **माजी राष्ट्रपती स्व. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा दि.१५ ऑक्टोबर हा जन्म दिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करणेबाबत.. . . .**

संदर्भः- १. शासन निर्णय क्र. वाप्रेदि-२०२०/प्र क्र ७०/भाषा ३, मुंबई -३२ दिनांक १४.०९.२०२०
२. संचालनालयाचा पत्र क्र. १६/आस्था/संकीर्ण/२०२०/१६४, दिनांक २८.०९.२०२०

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यांत येते की, दि.१५ ऑक्टोबर हा जन्म दिवस **'वाचन प्रेरणा दिन'** म्हणून साजरा करण्याबाबत संदर्भीय शासन निर्णयामध्ये सद्याच्या कोवीड-१९ च्या पार्श्वभूमीवर यावर्षी वाचन प्रेरणा दिन साजरा करण्याच्या दृष्टीने सूचना देण्यात आलेल्या आहेत त्याचे काटेकोर पालन करुन वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल DV-TTNatraj या Font मध्ये तयार करुन Soft Copy सह ई-मेलव्दारे सादर करावा. Hard Copy देखील पाठविण्यांत यावी.

प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत : या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.

माजी राष्ट्रपती स्व.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा दिनांक १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**मराठी भाषा विभाग**

**शासन निर्णय क्रमांक: वाप्रेदि-२०२०/प्र.क्र.७०/भाषा-३,**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

**दिनांक: १४ सप्टेंबर, २०२०**

अ.मु.स.
उच्च व तंत्र शिक्षण
यांचे कार्यालय
क्र. Gen. 685
दि. 21/9/2020

वाचा :- मराठी भाषा विभाग, शासन परिपत्रक क्र.वाप्रेदि-२०१५/प्र.क्र.८९/२०१५/भाषा-३, दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५.

शासन परिपत्रक :-

माजी राष्ट्रपती स्व.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने दिनांक १५ ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिवस "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. या निर्णयास अनुसरुन शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची प्रेरणा निर्माण करण्यासाठी व वाचनाची आवड वृध्दींगत करण्याच्या दृष्टीने यापूर्वी संदर्भाधीन शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या होत्या. सध्याच्या कोवीड – १९या संसर्गजन्य रोगाच्या प्रादुर्भावामुळे प्रतिबंधात्मक उपाय म्हणून संपूर्ण देशात काही निर्बंध घालण्यात आले आहेत. या पार्श्वभूमीवर या वर्षी वाचन प्रेरणा दिन साजरा करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे "वाचन प्रेरणा दिन" कार्यक्रम साजरा करण्याच्या दृष्टीने सर्व मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालये, शासकीय संस्था / मंडळ, सार्वजनिक उपक्रम इ. कार्यालयांनी देखील विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. ऑनलाईन कार्यक्रम / चर्चासत्रे / प्रशिक्षण ही कोविडच्या पार्श्वभूमीवर काळाची गरज आहे. ही बाब लक्षात घेता वाचन संस्कृती वाढीस लागण्याच्या दृष्टीने जास्तीत जास्त कार्यक्रम ऑनलाईन पद्धतीने करण्यात यावे.

२. जिथे प्रत्यक्षरीत्या कार्यक्रम करणे शक्य आहे तिथे केंद्र शासन/राज्य शासन यांनी आखून दिलेल्या कोविड मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

३. "वाचन संस्कृती" जोपासण्यासाठी सर्वांनी आपले मित्र, कुटुंबातील सदस्य इत्यादींना किमान एक पुस्तक पीडीएफ स्वरूपात ऑनलाइन पद्धतीने पाठवून त्यांना वाचनास प्रोत्साहन द्यावे.

४. WhatsApp, Internet, Facebook, Twitter अशा प्रकारच्या सामाजिक प्रसार माध्यमातून वाचन संस्कृती वृध्दींगत होईल /वाचनास प्रेरणा मिळेल असे संदेश प्रसारीत करावेत.

५. मराठी वाचन संस्कृती जपण्यासाठी सर्वांनी डिजीटल माध्यमाचा जास्तीत जास्त वापर करुन मराठीतील साहित्य स्वयंस्फुर्तीने वाचकांना पाठवावे.

६. सर्व संस्थांनी सोशल मीडियावर "मराठी वाचन कट्टा ' निर्मिती करावी.

७. "वाचन संस्कृती" वाढीस लागावी तसेच विद्यार्थ्यांना मराठी भाषेशी संलग्न रोजगाराच्या संधीची माहिती या दृष्टीने रोजगारभिमुख चर्चासत्राचे आयोजन करण्यात यावे. उदा. व्यवसायिक लेखक कसे बनावे, अनुवाद कसा करावा,संहिता लेखन, गीत लेखन इत्यादी.

८. सर्व संस्थांनी आपल्या स्तरावर मराठी डिजिटल साहित्य संमेलनाचे आयोजन करावे.

९. विकीपीडीया सारख्या माध्यमावर मराठीत जास्तीत जास्त लेखन व्हावे याकरीता यासंबधीच्या कार्यशाळा आयोजीत करण्यात याव्यात.

सदर कार्यक्रम साजरा करताना कोविडच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासन/राज्य शासन यांच्या मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२००९१४१४०१०११०३३ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AJAY DHONDBARAO BHOSALE

Digitally signed by AJAY DHONDBARAO BHOSALE
DN: CN = AJAY DHONDBARAO BHOSALE, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = NA
Date: 2020.09.14 14:22:51 +05'30'

(अ.धों.भोसले)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, मुंबई,
१. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा.मंत्री (मराठी भाषा) यांचे खाजगी सचिव / विशेष कार्यकारी अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
३. मा.राज्यमंत्री (मराठी भाषा) यांचे खाजगी सचिव / विशेष कार्यकारी अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
४. मा.मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५. मा. विरोधी पक्षनेता (विधानपरिषद/विधानसभा) यांचे खाजगी सचिव, मुंबई,
६. मा.मुख्य सचिव / सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई (पत्राने),
८. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई (पत्राने),
९. प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१०. सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ, विधान भवन, मुंबई,
११. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१२. सर्व मंत्रालयीन विभाग,